# <u>परिपत्रक 314 दिनांक 14/7/2005</u>

विषय:- मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 च्या
कलम 41(ड) अन्वये सुरु केलेल्या स्वयंखुद्द चौकशी प्रकरणाबाबत.

असे निदर्शनास आले आहे की, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 मधील कलम 41(ड) अन्वये सुरु केलेल्या स्वयंखुद्द चौकशीची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. वस्तूत: अशी प्रकरणे धर्मादाय संघटनेमार्फत सुरु केली गेली असल्याने, ती लवकरात लवकर निकाली काढणे अपेक्षीत आहे. सर्वोच न्यायालयाने कृष्णावीरसिंग बचनसिंग चौहान विरुध्द वासुदेव मोतीराम व इतर (1995 Supp.(3) S.C.C.632) या प्रकरणात कलम 41(ड) ची स्वयंखुद्द प्रकरणे प्राधान्य (Priority) देऊन अधिकाऱ्यांनी चालवावीत असे निर्देश दिलेले आहेत. जेणेकरुन विश्वस्तांना न्यासाचे रेकॉर्डमध्ये ढवळाढवळ करता येणार नाही.

सर्व धर्मादाय सह आयुक्त यांना निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी वरील विषयात नमुद केलेली प्रकरणे प्राधान्याने निकाली काढावी व मासिक विवरणपत्रांमध्ये विशेष नोंदीव्दारे निकाली प्रकरणी कळवावीत.

याशिवाय अशा स्वयंखुद्द प्रलंबित प्रकरणांबाबतचे वार्षिक विवरणपत्र या कार्यालयास उलटटपाली सादर करावे.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
धर्मादाय सह आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पुणे/लातूर/अमरावती/नागपूर/नाशिक/कोल्हापूर/औरंगाबाद.